# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/06/2023 (गुरूवार) दुपार

## मोटर सायकल चोरी करणारा गुन्हेगार गजाआड

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

नागपुर ग्रामिण जिल्हयात मोटरसायकल चोरींच्या घटना वाढत असल्याने त्यावर आळा घालण्या करीता मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद नागपुर ग्रामिण यांनी दिलेल्या सुचने वरून पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांनी त्याकरीता विशेष पथक स्थापन केले होते. दिनांक २८/०६/२०२३ रोजी सदर पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस ठाणे भिवापूर येथे पाटील पेट्रोलपंप जवळ एक संशयित इसम फिरत असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन आरोपी नामे— १) **अक्षय पृथ्वीराज जांबुडकर, वय १९ वर्ष, रा. वार्ड नं. ५ लाखादूर ता. लाखादूर जि. भंडारा** याला ताब्यात घेतले. त्याने विचारपुस दरम्यान सदर मोटर सायकल चोरी ही मौजमस्ती करीता पैशांची आवश्यकता असल्याने चोरी केल्याचे सांगीतले. त्यांचे ताब्यातुन पोलीस ठाणे भिवापूर हद्दीतुन चोरी केलेली एक काळया रंगाची हिरो होंडा स्प्लेंडर मो. सा. क्र. MH ४० AA ८४९६ किंमती अंदाजे १५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून पोलीस ठाणे भिवापूर येथील अप. क्र. ३३०/२२ कलम ३७९ भा.द.वि. मोटरसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आलेला आहे.

नमुद आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील तपास कामी पोलीस ठाणे भिवापूर यांचे ताब्यात दिलेले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन भिवापूर करीत आहेत.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरिक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, रोशन काळे, पोलीस नायक विपीन गायधने, प्रमोद भोयर, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे यांचे पथकाने केली.



## अनैतिक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड
## पोलीस स्टेशन रामटेक यांची कारवाई

पो.स्टे. रामटेक :– पोलीस स्टेशन रामटेक येथील पोलीस स्टाफ यांना गुप्त बातमीदारां कडुन माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील हॉटेल (ढाबा) रसोई येथे एक **इसम नामे –१)अश्विन नरेंद्र उके, वय २८ वर्ष, रा. जांब ता. मोहाडी जि. भंडारा ह.मु योगीराज हास्पीटल जवळ रामटेक (हॉटेल चालक)** हा इसम स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता मुलींना पैश्याचे आमीष देवुन देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून हॉटेल (ढाबा) रसोई मध्ये रूम उपलब्ध करून त्याचे कडुन देहव्यवसाय करून घेत आहेत. अशी मुखबिराचे खात्रीशिर माहीती मिळाल्यावरून सदरची माहिती ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांना देवुन त्यांचे आदेशाने बोगस पंटर पंचनामा कारवाई करून बोगस ग्राहक पाठवुन व त्याच्या इशाऱ्या प्रमाणे पोलीस स्टाफसह रामटेक ते खिंडसी तलाव रोडवरील स्थित हॉटेल (ढाबा) रसोई जवळील हायवे रोडजवळ रेड कारवाई करून **२) सचिन ईश्वर वैद्य वय ३१ वर्ष रा. शिवणी भोंडकी ता. रामटेक (हॉटेल मॅनेजर)** दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– महिला सहायक पोलीस निरीक्षक स्वाती यावले पोलीस स्टेशन रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३, ४, ५, ७ अनैतीक व्यापार प्रतीबंध अधिनियम १९५९ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक यादव मो. क्र. ९८२३९१८४८६ हे करीत आहे.

सदरची कारवाई ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. आशित कांबळे, पोलीस निरीक्षक एच. एस. यादव, महिला सहायक पोलीस निरीक्षक स्वाती यावले, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लाजेवार, पोलीस नायक प्रफुल रंधई, अमोल इंगोले, महिला पोलीस नायक जोत्सना मसराम, पोलीस शिपाई शरद गिते, धिरज खंते, विशाल चव्हान, संतोष हटवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर